# संगमनेर सुपुत्र जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता प्रविण कोल्हे उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने सन्मानित

By **Admin** February 12, 2022 926 0




*Mr. Pravin Kolhe Receiving Best Engineer Award by Hon. Jayant Patil*

संगमनेर (प्रतिनिधी) –

पुणे येथील बालगंधर्व रंगमंदीरात जलसंपदा विभागाच्यावतीने आयोजित महात्मा फुले पाणीवापर संस्था अभियान व त्या अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था व्यवस्थापन व अभियांत्रिकी सेवेतील उत्कृष्ट अभियंता पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जलसंपदा मंत्री जयंत पाटील होते. यावेळी जलसंपदा विभागाचे विशेष कार्य अधिकारी विजयकुमार गौतम, सचिव विलास राजपूत, पुणे विभागाचे मुख्य अभियंता ह. वि. गुणाले उपस्थित होते. सिंचन व्यवस्थापनात पाणी वापर संस्थांचा सहभाग महत्त्वाचा असून राज्यातील पाणी वापर संस्थांचे बळकटीकरण आवश्यक असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी केले. जलसंपदा विभागाच्यावतीने दरवर्षी 15 सप्टेंबर रोजी पुरस्कार वितरण होईल अशी घोषणाही त्यांनी केली. यावेळी संगमनेरमधील जोर्वे गावचे सुपुत्र जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता प्रविण कोल्हे यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने ना. जयंत पाटील यांनी सन्मानित केले. यावेळी श्री. प्रवीण कोल्हे यांचे आई वडील, पत्नी प्रिया कोल्हे, मुली जाई-जुई, कुटुंबीय आणि विभागातील इतर सहकारी उपस्थित होते. या यशाचे श्रेय त्यांनी आपल्या कुटुंबियांना आणि सहकाऱ्यांना दिले.




*...e Receiving award with Family and Friends*



अभियंता प्रविण कोल्हे हे पाटबंधारे प्रकल्प सर्कल, पुणे येथे कार्यरत असून धरणे, कालवे, पाईपद्वारे सिंचनाचे जाळे, लघु जलविद्युत योजना इत्यादींसह पाणी आणि सिंचन पायाभूत सुविधांच्या बांधकामाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यापूर्वी त्यांनी पुणे पाटबंधारे विभागात कार्यकारी अभियंता म्हणून जल व सिंचन व्यवस्थापन उपक्रमांची जबाबदारी सांभाळली. एमपीएससी द्वारे आयोजित महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा-2004 मध्ये WRD मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केल्यानंतर त्यांनी यापूर्वी कार्यकारी अभियंता आणि सहाय्यक कार्यकारी अभियंता ही पदे भूषवली होती.

त्यापूर्वी, श्री. प्रवीण कोल्हे यांनी 2004 मध्ये स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये रँकर म्हणून पुणे विद्यापीठातून सुवर्णपदक मिळवले आणि त्यानंतर 2007 मध्ये त्यांनी आयआयटी कानपूरमधून एमटेक पूर्ण केले. नंतर, 2014 मध्ये, त्यांनी आयआयएम इंदूरचा ई-गव्हर्नन्समध्ये एक्झिक्युटिव्ह पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम पूर्ण केला. . त्यांनी एमबीए (फायनान्स), लोक प्रशासनात मास्टर ऑफ आर्ट्स आणि तीन पदव्युत्तर पदविका पूर्ण केल्या आहेत.

आयआयटी बॉम्बे येथे बाह्य उमेदवार म्हणून ते पीएच. डी. कोर्स करत आहेत.

श्री प्रवीण कोल्हे यांना सिंचन व्यवस्थापनातील त्यांच्या कार्याबद्दल 2019 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट अभियंता पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. 2019 मध्ये, WRD च्या वतीने, त्यांना जल व्यवस्थापनात ड्रोन वापरल्याबद्दल भूस्थानिक उत्कृष्टता पुरस्कार मिळाला. एकात्मिक राज्य जल आराखड्यातील त्यांच्या सहभागाचे महासंचालक, MERI यांनी कौतुक केले. 2011 मध्ये त्यांना महाराष्ट्र सरकारच्या प्रधान सचिवांच्या हस्ते सर विश्वेश्वरय्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ते 13 तांत्रिक आणि वैज्ञानिक संस्थांचे आजीवन सदस्य आहेत आणि ते इंडिया वॉटर वीकसह परिषदांमध्ये वक्ते आहेत. भारतातील विविध संस्थांमध्ये त्यांनी अतिथी व्याख्यानेही दिली आहेत. त्यांनी स्वतःची वेबसाइट अर्थात www.pravinkolhe.com डिझाइन, होस्ट आणि व्यवस्थापित केली आहे जेथे सिव्हिल इंजिनिअरिंगचे अभ्यास साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाते.






कार्यक्रमात जलसंपदा मंत्री श्री. पाटील पुढे म्हणाले की, पाणी वापर संस्थाचे व्यवस्थापन कार्यक्षम होण्या सोबतच पाणी वापर संस्था सक्षम होण्यासाठी जलसंपदा विभागाने वापर संस्था सक्षम होण्यासाठी जलसंपदा विभागाने सुरु केलेली महात्मा फुले पाणी वापर संस्था व्यवस्थापन पुरस्कार योजना अत्यंत महत्वपूर्ण आहे. राज्यात पाणी वापर संस्थाच्या माध्यमातून पाण्याची सेवा देण्याचे कार्य सुरु आहे. गावशिवारातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी यंत्रणांसोबत पाणी वापर संस्थाचाही सहभाग आवश्यक आहे.




जलसंपदा विभागाचे विशेष कार्य अधिकारी विजयकुमार गौतम म्हणाले, सिंचन क्षेत्रात पाणी वापर आहे. सिंचन क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव होण्यासोबतच इतरांना प्रेरणा मिळावी यासाठीच ही पुरस्कार योजना आहे. पाणी वापर संस्थांनी सक्षम होण्यासोबतच पाण्याच्या काटेकारे नियोजनात अधिकाधिक सहभाग वाढवावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पाणी वापर संस्था व अभियांत्रिकी सेवेतील उत्कृष्ट अभियंता यांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला राज्यातील पाणीवापर संस्थाचे प्रतिनिधी, जलसंपदा विभागीत अधिकारी उपस्थित होते.

**जलसंपदा विभाग उत्कृष्ट अभियंता गौरव पुरस्कार प्राप्त मान्यवर :**

र. रा शुक्ला (कार्यकारी अभियंता), राजेश मोरे (उपसचिव), ह्रा. आ. बागडे (कार्यकारी अधिकारी), श्रीराम हजारे, (सहायक अभियंता), योगेश सावंत, (शाखा अभियंता), बबन राठोड (शाखा अभियंता), श्रीरंग ठवरे, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीचे दिलीप जोशी,कार्यकारी अभियंता जयंत खाडे, उपविभागीय अभियंता दिपीका भागवत, सहायक अभियंता गिरीश अपराजित, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे विलास पाटील, सहायक अभियंता गजानन घुगल, अधिक्षक अभियंता प्रसाद नार्वेकर, अधिक्षक अभियंता प्रविण कोल्हे, उपविभागीय अधिकारी प्रशांत आडे, महेंद्र जोशी उपविभागीय अधिकारी, शाखा अभियंता जयसिंग हिरे, शाखा अभियंता कैताण बार्देस्कर, शाखा अभियंता राजकुमार पवार यांचाही पुरस्काराने गौरव करण्यात आला.

## कनेक्ट रहा

| | | |
|---|---|---|
| 21,724 चाहते | 2,506 अनुयायी | 0 सदस्य यादी |

## नवीनतम लेख